## नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०२५ मधील निशाणी २२ खालील आदेश
## (CNR No. MHRT08-000120-2025)

प्रस्तुतचा अर्ज प्रस्तावित प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे आदेश १ नियम १०(२) अन्वये, त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ठ करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जात असे कथन आहे की, दावा मिळकती यापुर्वी मुळ पुरुष – कै. गणपत रामा (कान्हा) बाईत यांच्या मालकी कब्जेवाहीटीच्या होत्या. ते दिनांक २६/०९/२०११ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे पश्चात तुकाराम बाईत, रामचंद्र बाईत, मोहन बाईत, वासंती बाईत व वंदना बाईत, असे एकुण पाच कायदेशीर वारस आहेत. तसा फेरफार गाव मौजे लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, येथे क्रमांक १४५० नुसार नोंद असुन सदर मिळकती वारस हक्काने प्राप्त झाल्या आहेत. गणपत बाईत यांनी त्यांच्या कमाईतुन मौजे लोवले, फटकरेवाडी, येथे घर बांधले असुन त्याचा घरपट्टी पावती क्रमांक १५४ असा आहे. गणपत बाईत यांच्या निधनानंतर सदर घराचे तुकाराम, वंदना व रामचंद्र बाईत असे तीन हिश्श्यांमध्ये वाटप झाले.

०३. अर्जात पुढे असे कथन आहे की, वादी व प्रस्तावित प्रतिवादी कामानिमित्त मुंबई येथे राहत असुन प्रतिवादी ही दावा मिळकतीमध्ये वास्तव्य करीत आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीच्या हिश्श्यात राहत असल्याने खोलीमध्ये देवघर असुन वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वारंवार भांडणे होत असतात. सदरचे देवघर हा वादाचा मुळ मुद्दा असुन देवघरातील देव दोघे घेण्यास तयार नसल्याने प्रस्तावित प्रतिवादी यांच्या हिश्यातील खोलीमध्ये देव ठेवण्याचा त्यांनी आग्रह केला असता, त्यास वादविवाद होत आहेत. सदर देवघरातील देव हे प्रस्तावित प्रतिवादी त्यांच्या

हिश्यास असलेल्या खोलीमध्ये ठेवण्यास तयार आहेत. त्यामुळे, ते दाव्यात आवश्यक पक्षकार असुन त्यांची बाजु ऐकुन घेणे आवश्यक असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यास त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** वादींनी निशाणी क्रमांक २६ अनव्ये म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. प्रस्तावित प्रतिवादींचे वादींसोबत गेल्या अनेक वर्षांपासुन वाकडीकीचे संबंध आहेत. त्यांनी प्रतिवादीला दिलेल्या चिथावणीनुसार प्रतिवादीने दरवाजावर सुचना लावुन ठेवली आहे. रामचंद्र यांना प्रतिवादींची खोली मिळविण्याचा दृष्ट हेतु असुन रामचंद्र व त्यांचा मुलगा यांनी त्यांच्या हिश्यात येण्यास वादींना मनाई केलेली आहे. अर्जातील देवघरातील देव ठेवण्यासाठी केलेले अर्जातील विधान हे पुर्णपणे खोडसाळ स्वरुपाचे व वादींना त्रास देण्यासाठी केलेले आहेत. त्यामुळे, अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

**०६.** प्रस्तुतचा दावा हा आदेशात्मक ताकीद व निरंतर ताकीदीकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी हिने देवघराच्या दरवाजाला लावलेले कुलुप काढुन घेण्याचा आदेश होण्यासाठी व देवघरात देवाची पुजा, गणपती उत्सव व धार्मिक कार्य करण्यास प्रतिवादीने वादींना हरकत अडथळा करु नये, असा दिलासा दाव्यात मागितला आहे. प्रतिवादीने दाखल केलेल्या कैफियतमध्ये वादपत्रातील कथने नाकारली आहेत. प्रस्तावित प्रतिवादी यांचे दावा मिळकतीच्या घरात हिस्सा असल्याची बाब वादींनी नाकारली नाही. वादी व प्रतिवादीचे विरुध्द अभिकथनांवरुन देवघरातील देव हा मुळ वादमुद्दा असल्याचे दिसुन येते. प्रस्तावित प्रतिवादी हे देवघरातील देव घेवुन जाण्यास तयार असल्याचे अर्जात म्हणणे मांडले आहे.

त्यामुळे, मुळ वादाचा मुद्दा निकाली करण्यासाठी किंवा वादाचे स्वरुप पाहता, प्रस्तुतचा दावा हा समजुतीच्या आधारे निकाली काढण्यासाठी प्रस्तावित प्रतिवादी दाव्यात हजर होणे आवश्यक आहे. दाव्याच्या स्वरुपावरुन प्रस्तावित प्रतिवादी हे आवश्यक पक्षकार असल्याचे दिसुन येत नाही. परंतु, ते योग्य पक्षकार आहेत. त्यांना पक्षकार केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल, असे दिसुन येत नाही. प्रस्तावित प्रतिवादीला दाव्यात समाविष्ठ केल्यास दाव्यातील वादमुद्दयांवर प्रभावीपणे व पुर्णपणे निर्णय देण्यास मदत होईल. त्यामुळे, प्रस्तुत प्रस्तावित प्रतिवादीस प्रतिवादीपणात समाविष्ठ करणे गरजेचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज विनाखर्च मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तावित प्रतिवादीस प्रतिवादीपणात समाविष्ठ करुन दावा दुरुस्ती मुदतीत करुन दुरुस्ती प्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.20 17:19:58 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक २०/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,

देवरुख. जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 20/12/2025 |
| Order signed by PO. on | :- | 20/12/2025 |
| Order uploaded on | :- | 20/12/2025 |